# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

### अपील क्रमांक : २९८६/२०२४

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. रामप्रसाद अंतारामजी वैद्य, रा. बोरगांव(चौ.), पो. आसगांव, ता. पवनी, जि. भंडारा-४४१९१० | सचिव, ग्राम पंचायत, बोरगांव(चौ.), ता. पवनी जि. भंडारा | विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती कार्यालय, पवनी, ता. पवनी जि. भंडारा |

**सुनावणी दिनांक :- १८.०६.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १२.११.२०२४

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.११.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : कोणतीही माहिती पुरविली नाही

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जोडपत्र-अ नुसार संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १५.०२.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १५.०२.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन -२०२४

(४)जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : “सन १९८३-१९८५ ग्रामपंचायत रेकॉर्ड नुसार त्या वर्षात कोणाचे नाव दर्ज होते. त्यावेळेसचा घर भु. गट क्र. ६११ व ६१२ हया गटावरचे घर कोणाचे नावे होते. सदर भु. गट क्र. ६११ व ६१२ श्री. सुभाष अंतारामजी वैद्य यांनी त्याच गटावरती कधी घर बांधले. नमूना ८ चा क्षेत्रफळ सन १९८३-१९८५ चा सविस्तर तपशिलवार मुद्देसुद प्रतिरुप देण्यात यावी. (१) सुभाष वैद्य यांनी भु. गट क्र.६११, ६१२ च्या जागेवर बांधकाम करण्यासाठी सादर केलेल्या दस्ताऐवजाची दिनांक महिना सन ७/१२ वर नाव अभिलेखाच्या आधारावर अर्ज केले, त्याची सविस्तर तपशिलवार माहिती ग्रामपंचायत कार्यालय सरपंच सचिव यांनी मागणी केलेले

दस्ताऐवज अर्जावर विचार मंथन केलेल्या प्रोसीडिंगवर नमूद केलेल्या ठरावाची प्रतीरुप अर्जदारास देण्यात यावे. (२) ग्रामपंचायत कार्यालयानी बांधकामासाठी दिलेल्या परवानगीची प्रत देण्यात यावी. (३) सदर अर्ज ग्रामपंचायतच्या सभेच्या चर्चमध्ये पारीत झालेल्या ठरावाची प्रत देण्यात यावी. (४) सुभाष वैद्य यांना बांधकामाची परवानगी दिलेल्या क्षेत्रफळाची जागेची माहिती अर्जदारास देण्यात यावी. (५) बांधकाम मौका चौकशी मंजूरी दिल्याची पंचनाम्याची प्रतिरुप अर्जदारास देण्यात यावी. (६) असुर बुध्दीचा वापर करुन दि. १२.०१.२०२४ च्या ठरावात नमूद केले असेल तर लेखी उत्तर द्यावे" असे नमूद करुन एकूण ६ मुद्दयांवर माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहित अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०८.०७.२०२४

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ८.०७.२०२४

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : जोडपत्र-अ नुसार प्रतिसाद दिला नाही

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ३१.०७.२०२४ रोजी सुनावणी घेवून "(१) अपील अर्ज मान्य करण्यात येत आहे. (२) उपरोक्तनुसार माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(१) नुसार ३० दिवसाचे आत माहिती पुरविणे बंधनकारक आहे. तरीपण अर्जदाराने मागणी केलेली माहिती निशुल्क १० दिवसाचे आत पुरविण्यात यावी व तसा माहिती दिल्याचा अहवाल कळविण्यात यावा" असे आदेशित करुन अर्ज निकाली काढले.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा** – आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार दिलेली माहिती ही पूर्णपणे बनावट स्वरुपाची आहे.

त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री. अंशुमन पंधरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचा.), पंचायत समिती पवनी, कु. के. डी. दवंड यांनी स्प्ष्ट केले की, अपिलकर्ता यांना जोडपत्र- अ च्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती वेळोवेळी पुरविण्यात आलेली आहे.

६. **निष्कर्ष :**– अपिलकर्ता, श्री. रामप्रसाद अंतारामजी वैद्य यांनी जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत, बोरगांव(चौ.), ता. पवनी जि. भंडारा यांच्याकडे माहितीसाठी अर्ज सादर केला होता. त्यांच्या या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी ग्राम पंचायत, बोरगांव(चौ.) येथील अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे आज सुनावणीला उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

परंतु सदर माहिती ही पूर्णपणे बनावट स्वरुपाची तसेच खोडतोड करणारी आहे, असा अपिलकर्ता यांनी सुनावणी दरम्यान आक्षेप नोंदविला. ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम पंचायत, बोरगांव(चौ.), ता. पवनी जि. भंडारा यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थी, श्री. रामप्रसाद वैद्य यांना माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती संदर्भात नोंदणीकृत पोच देय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी ८ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवून कार्यालयात बोलावून माहिती अधिकार अधिनियम दुसरी सुधारणा २०१२ मधील कलम ३(ख) नुसार अभिलेखाचे निरिक्षण द्यावे. तसेच अपिलकर्ता, श्री. रामप्रसाद वैद्य यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर त्यांना कोणती माहिती अपेक्षीत आहे, हे त्यांच्याकडून समजून घेतल्यानंतर त्यांच्या मूळ माहिती अर्जात मागितल्याप्रमाणे तसेच रेकॉर्डवर उपलब्ध असल्याप्रमाणे देय असलेली माहिती पुरविण्यात यावी. तसेच यापूर्वी जी माहिती देण्यात आली आहे, ती माहिती पुन्हा देण्याचे प्रयोजन नाही, असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढणे अपेक्षीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम पंचायत, बोरगांव(चौ.), ता. पवनी जि. भंडारा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १५.०२.२०२४रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती संदर्भात नोंदणीकृत पोच देय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी ८ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती वगळून उर्वरित माहिती त्यांच्या जोडपत्र-अ अनुषंगाने उपलब्ध असल्यास त्यापैकी ५० पृष्ठापर्यंतची माहिती नि:शुल्क पुरवावी. त्यापुढील माहितीची पृष्ठे विहित शुल्क आकारुन अपिलार्थीस १५ दिवसात समक्ष/नोंदणीकृत टपालाने पुरवावे. जी माहिती उपलब्ध नाही, त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसांत पाठवावे.

२) वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १८.०६.२०२६

जावक क्रमांक ९९९८ दिनांक 4 AUG 2026